# कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी जिल्हास्तरावरील स्थानिक तक्रार समितीवर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी नामांकने सादर करणेबाबत जाहिरात

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ व नियम दिनांक ०९/१२/२०१३ नुसार अधिनियमातील कलम ६(१) अंतर्गत जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार निवारण समिती गठीत करण्याची तरतूद आहे. महिला व बाल विकास विभाग शा. नि. क्र. मकचौ २०१४ (प्र.क्र. ६३/मकक मुंबई, दि. ११/९/१४ या शासन निर्णयात नमूद तरतुदीनुसार पुणे जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार निवारण समितीमधील अध्यक्ष व सदस्यांची (नामनिर्देत) पात्रता खालीलप्रमाणे नमूद आहे.

**अध्यक्ष** : सामाजिक कार्याचा ५ वर्षांचा अनुभव असलेल्या आणि महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या महिलांमधून नामनिर्देशनाने

**दोन सदस्य** : महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या अशा अशासकीय संघटना/ संघ किंवा लैंगिक छळाच्या प्रश्नांशी परिचित असलेली व्यक्तींमधून दोन सदस्य नामनिर्देशनाने त्याचेपैकी किमान एक सदस्य महिला असावी. (नियम कलम ४ लैंगिक छळासंबंधित समस्यांची परिचित व्यक्तीचा अर्थ स्पष्ट केला आहे)

**'लैंगिक छळासंबंधित समस्यांशी परिचित व्यक्ती म्हणजे जिला या विषयासंबंधी तज्ज्ञता आहे आणि त्याचबरोबर खालीलपैकी एकाचा त्यात समावेश असावा. महिलांच्या सक्षमीकरणाचा विशेष करून कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबतचा सामाजिक कामाचा कमीतकमी ५ वर्षांचा अनुभव असलेली सामाजिक कार्यकर्ता असावी. कामगार, सेवा, दिवाणी आणि फौजदारी कायद्याशी परिचित व्यक्ती'**

(I) परंतु त्यापैकी किमान एका नामनिर्देशित सदस्यांची पार्श्वभूमी प्राधान्याने कायद्याची (Legal) असावी.

(II) तसेच, त्यापैकी किमान एक नामनिर्देशित सदस्य अनुसूचित जाती, जमाती किंवा इतर मागासवर्गीय किंवा अल्पसंख्याक समाजातील महिला असावी

अर्जदाराने अर्ज सादर करताना वरील पात्रता पूर्ण करीत असल्याबाबतीत कागदपत्रे जोडून दोन प्रतीत प्रस्ताव (उपरोक्त प्रमाणित कागदपत्रासह) ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, २९/२, गुलमर्ग पार्क सोसायटी, विजय बेकरी, सोमवार पेठ, पुणे-०५** या पत्त्यावर पोहोचतील या बेताने पाठविण्यात यावा.

मा. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २६) पुणे यांना सदर अधिनियमान्वये निश्चित केलेली कर्तव्ये/ कार्य पार पाडण्यासाठी जिल्हा अधिकारी (District Officer) म्हणून मा. जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्राधिकृत केलेले आहे. सबब, निवडीबाबतचे सर्व अधिकार मा. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २६), पुणे यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहे.

स्वाक्षरी/-

**- उपजिल्हाधिकारी**

**(भूसंपादन क्र. २६), पुणे**

(डीजीआयपीआर/२०२०-२०२१/३०४३)